दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com  epaper.lokrakshanay.com  dainiklokrakshanay@gmail.com  + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२७२ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, रविवार, १७ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा! एप्रिल, मे, जूनमध्ये मतदान

### महाराष्ट्रात होणार पाच टप्प्यात निवडणुका- मुख्य निवडणूक आयुक्त




■ **नवी दिल्ली, प्रगती शर्मा:**
देशात लोकसभा निवडणुकीचं बिगुल वाजलं असून केंद्रीय निवडणूक आयोगाने सात टप्प्यातील निवडणूक कार्यक्रम आज जाहीर केला. त्यानुसार १९ एप्रिलपासून देशात लोकसभा निवडणूक होणार असून ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. तर, महाराष्ट्रातही ५ टप्प्यांत निवडणूक होणार आहे. यंदा १८ व्या लोकसभेसाठी निवडणूक होत आहे.

२०१९ साली स्थापन झालेल्या मोदी सरकारचा कार्यकाळ ६ जून रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे देशात लोकसभेच्या निवडणुका घेण्यात येत आहे. त्यानुसार, १९ एप्रिलपासून लोकसभा निवडणुकीच्या मतदानाला सुरुवात होणार असून २ जून रोजी सात टप्पे संपणार आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त राजीव कुमार म्हणाले, देशात लोकसभा निवडणूक ५४३ जागांवर निवडणूक होणार आहे. सात टप्प्यात ही निवडणूक होणार असून पहिला टप्पा १९ एप्रिल रोजी पार पडणार आहे.

अरुणाचल प्रदेश, अंदमान-निकोबार, आंध्र प्रदेश, चंदीगढ, दादरा नगर हवेली, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, हरियाणा, केरळ, लक्षद्वीप, लडाख, मिझोराम, मेघालय, नागालँड, पुद्दुचेरी, सिक्कीम, तामिळनाडू, पंजाब, तेलंगणा, उत्तराखंड आदी राज्यांत एका टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

कर्नाटक, राजस्थान, त्रिपुरा, मणिपूर या राज्यांमध्ये दोन टप्प्यांत मतदान होईल. तर, छत्तीसगड, आसाममध्ये तीन टप्प्यांत मतदान होईल. ओडिशा, मध्य प्रदेश, झारखंड या राज्यांमध्ये चार टप्प्यात मतदान होणार असून महाराष्ट्र, जम्मू आणि काश्मीरमध्ये पाच टप्प्यात मतदान होईल. तसंच, उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये सात टप्प्यांत मतदान होणार आहे.

महाराष्ट्रात ४८ जागांसाठी पाच टप्प्यांत मतदान होणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी मतदान ५ जागांसाठी मतदान होईल. दुसऱ्या टप्प्यातील मतदान २६ एप्रिलला होणार असून यावेळी ८ जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडेल. ७ मे रोजी तिसऱ्या टप्प्यातील प्रक्रियेत ११ जागांसाठी मतदान होणार आहे. तर, १३ मे रोजी होणाऱ्या चौथ्या टप्प्यातील प्रक्रियेतही ११ जागांसाठी मतदान होईल. २० मे रोजी पाचव्या टप्प्यातील मतदान होणार असून १३ जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडेल.

- **पहिला टप्पा** - १९ एप्रिल -रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदीया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर
- **दुसरा टप्पा** - २६ एप्रिल - बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ - वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी
- **तिसरा टप्पा** - ७ मे - रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी- सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले
- **चौथा टप्पा** - १३ मे - नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, बीड
- **पाचवा टप्पा** - २० मे - धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबईतील सहा मतदारसंघ
- **मतमोजणी** - ४ जून- लोकसभेच्या निवडणुकीसह देशातील काही राज्यात विधानसभेच्याही निवडणुका होणार आहेत. त्यानुसार, सिक्कीमच्या ३२ जागांवर आणि अरुणाचल प्रदेशच्या ६० जागांवर १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. तर, आंध्र प्रदेशच्या १७५ जागांसाठी १३ मे रोजी मतदान होईल.

**यंदाच्या निवडणुकीचं वैशिष्ट्य काय?**

- देशात ९६ कोटी मतदार आहेत.
- ५ लाख मतदान केंद्र आहेत, १.५ कोटी निवडणूक कर्मचारी
- ५० लाख ईव्हीएम आहेत.
- आत्तापर्यंत ४०० विधानसभा निवडणूका झालेल्या आहेत. १६ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूका झाल्या आहेत. गेल्या वर्षभरात ११ विधानसभा निवडणूका झाल्या आहेत.
- १.८ कोटी नवमतदार आहेत जे पहिल्यांदा मतदान करणार आहेत.
- ८२ लाख मतदार ज्यांचे वय ८५ वर्षापेक्षा जास्त आहे.
- २ लाख मतदार आहेत ज्यांचे वय १०० वर्षांपेक्षा जास्त आहे
- १८ हजार ट्रान्सजेंडर मतदान
- ज्यांचे वय ८५ वर्षापेक्षा जास्त असेल, दिव्यांगांमध्ये ज्यांची श्रेणी ४० टक्क्यांपेक्षा जास्त असेल आणि त्यांनी फॉर्म १२ डी च्या माध्यामातून नोंदणी केली तर घरी जाऊन त्यांचे मतदान घेतले जाईल.

## मुंबई महापालिकेच्या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची निवडणूक कामांसाठी नियुक्ती; आरोग्य सेवेवर परिणाम होण्याची शक्यता



■ **मुंबई, नितीन देवळेकर :**
लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या पाच वैद्यकीय महाविद्यालये व अन्य उपनगरीय रुग्णालयांतील सुमारे ३० टक्के कर्मचाऱ्यांची नियुक्ती निवडणुकीच्या कामासाठी करण्यात आली आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेतील आरोग्य सेवेवर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

मराठा आरक्षणासाठी करण्यात आलेल्या सर्वेक्षणानंतर शीव, नायर, कूपर, केईएम आणि नायर दंत महाविद्यालयाबरोबर आरोग्य विभागातील सुमारे ८०० कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये प्रशासकीय कर्मचाऱ्यांबरोबरच निम्न वैद्यकीय कर्मचारी व तंत्रज्ञांचा समावेश आहे. महानगरपालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, केईएम रुग्णालयातील १३० कर्मचारी, शीव रुग्णालयातील ११० कर्मचारी, नायर रुग्णालयातील १०० कर्मचारी, कूपर रुग्णालयातील ३० आणि नायर दंत महाविद्यालयातील १०० कर्मचारी आणि आरोग्य विभागातील २०० कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णालयातील आरोग्य सेवेवर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

रुग्णालयातील प्रयोगशाळा तंत्रज्ञांची निवडणुकीच्या कामावर नियुक्ती केल्याने रुग्णांना रक्त, सीटी स्कॅन, एमआरआयचे अहवाल मिळण्यास विलंब होत आहे. तसेच परिचारिकांची नियुक्ती केल्यामुळे त्याचा परिणाम थेट रुग्ण सेवेवर होण्याची चिन्हे आहेत. तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याने सुट्टीचे अर्ज, सेवानिवृत्तीची काम रखडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामासाठी पाठविणे अनिवार्य आहे. परंतु आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामावर पाठवताना सेवेवर कोणताही परिणाम होणार नाही व रुग्णांना त्रास होणार नाही, याची आम्ही काळजी घेण्यात येत असल्याचे मुंबई महानगरपालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

## राज्यामधील शालेय शिक्षकांना आता ड्रेस कोड लागू; शिक्षणमंत्री केसरकर यांची घोषणा



■ **मुंबई, यश सावंत :**
राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. सर्व शाळांच्या दृष्टीने हा महत्वाचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार, आता राज्यभरातील प्रत्येक शाळेत शिक्षकांसाठी ड्रेसकोड लागू होणार आहे. शाळांमध्ये जसा विद्यार्थ्यांना गणवेश असतो तसेच आता शिक्षकांनाही ड्रेसकोड लागू होणार आहे. त्यामुळे आता शिक्षकांनाही शाळेत ठरवून देण्यात आलेले कपडे घालून यावे लागेल. राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी याबाबत महत्वाची घोषणा केली. एकाच रंगाचा ड्रेसकोड सर्व शिक्षकांनी वापरावा, शाळेत शिक्षकांनी जीन्स, टी-शर्ट वापरू नये अशा सूचना देखील सरकारकडून शाळांना देण्यात आल्या आहेत. राज्यभरातील शाळांमध्ये ड्रेसकोड लागू झाल्यानंतर शिक्षकांना त्यांच्या मनाप्रमाणे कोणतेही कपडे परिधान करता येणार नाहीत. शिक्षकांच्या कपड्याचा रंग कुठला असावा याबाबत शाळेने निर्णय घ्यावा असं शासनाने सांगितलं आहे. व्यवस्थापनाने नेमून दिलेले कपडे सर्व शिक्षकांना घालावे लागतील. या नियमाप्रमाणे महिला शिक्षकांसाठी साडी अथवा सलवार-चुडीदार, कुर्ता,दुपट्टा असा पेहराव असावा. तर पुरूष शिक्षकांना शर्ट-ट्राउझर पँट घालावी लागेल. त्यांच्या शर्टचा रंग फिकट तर पँटचा रंग डार्क असावा.

## शालेय विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेचे धडे, वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्याच्या सूचना



■ **कल्याण, भावना जैन :**
अल्पवयीन मुलांनी वाहने चालविणे धोकादायक असून, तो गंभीर गुन्हा आहे. मात्र, गरजेसाठी विद्यार्थांना वाहने चालवायचीच असतील, तर त्यांच्यासाठी इलेक्ट्रिक दुचाकी हा पर्याय आहे. शून्य अपघात आणि त्यापलीकडे जाऊन अपघात पूर्ण रोखण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे किती गरजेचे आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहने पार्किंगच्या जागेवरच पार्क करावीत यांसारख्या सूचना प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने डोंबिवलीतील तोंडवळकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांबाबत 'आरटीओ'कडून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी रमेश कल्लूरकर, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक हेमंत जयकर, रोहित पवार, रिक्षा युनियनचे नेते अंकुश म्हात्रे, भिकाजी झाडे, शेखर जोशी आणि तोंडवळकर विद्यालयचे शिक्षक याप्रसंगी उपस्थित होते. यावेळी उपस्थित असलेल्या शाळेच्या विद्यार्थ्यांना शालोपयोगी दपतरे देण्यात आली. रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त वेगवेगळ्या मार्गाने जनजागृती करत अपघात कमी करण्याबरोबरच वाहनचालकांकडून वाहतुकीच्या नियमाचे पालन केले जावे, वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहन चालकांनीही पुढे यावे, यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

## पालघरमध्ये अत्याधुनिक मध्यवर्ती कारागृहासाठी सरकारकडून ६३० कोटींचा निधी मंजूर




■ **बोईसर, सचिन कदम :**
पालघरमध्ये २५ एकर जागेवर लवकरच मध्यवर्ती कारागृह बांधण्यात येणार असून त्यासाठी ६३० कोटींचा निधी राज्य सरकारकडून मंजूर करण्यात आला आहे. कैद्यांसाठी सर्वसुविधायुक्त अत्याधुनिक पद्धतीने बांधण्यात येणाऱ्या या कारागृहाची क्षमता १५०० कैद्यांची राहणार असून, यामुळे ठाणे आणि तळोजा येथील मध्यवर्ती कारागृहांवर पडणारा अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

पालघर जिल्ह्यातील पाचशेहून अधिक कैदी ठाणे व तळोजा येथील कारागृहात ठेवण्यात आले आहेत. त्यांना सुनावणीसाठी न्यायालयात ने आण करण्यासाठी पोलिसांना अनुक्रमे १०० ते १२५ किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. त्यासाठी पोलिसांचे अतिरिक्त मनुष्यबळ लागत असून कैद्यांना न्यायालयात आणण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने त्रासदायक ठरत आहे. मध्यवर्ती कारागृह उभारण्यासाठी पालघर जिल्हा निर्मितीपासून प्रयत्न सुरू असून त्या प्रयत्नाला यश आले आहे. त्यानुसार उमरोळी येथील जागा मध्यवर्ती कारागृहासाठी निश्चित करण्यात आली आहे. पालघर जवळील उमरोळी येथील शासनाच्या अख्यातरित असलेली सर्वे क्रमांक ३०८ मधील सुमारे २३० एकर जागेपैकी मध्यवर्ती कारागृहासाठी २५ एकर जागा निश्चित करण्यात येऊन ती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तुरुंग प्रशासनाकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रीया पूर्ण करण्यात आली आहे.

**या सुविधांचा असणार समावेश :**

- जलदगती सूचना आणि कृतींसाठी उच्च-सुरक्षा सेल
- पुरुष, महिला आणि तृतीयपंथी कैद्यांसाठी स्वतंत्र कक्ष.
- सर्व आवश्यक सुविधांसह रुग्णालय.
- स्वयंपाकघर, गॅस, बँक आणि दैनंदिन स्वयंपाकासाठी धान्य ठेवण्यासाठी जागा.
- बहुउद्देशीय सभागृहाच्या जागेसह वृक्षारोपण आणि नवीन रोपांची निर्मिती
- मध्यवर्ती पाहणी मनोरा आणि वाचनालय
- चांगल्या पायाभूत सुविधांसह कर्मचारी निवासस्थाने
- अतिथिगृह जागा.

## महानगरपालिका आयुक्तांच्याच बंगल्याची १४ वर्षापासून कर थकबाकी



■ **मुंबई, विशाल कारंडे :**
मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या कर निर्धारण व संकलक विभागाने मालमत्ता कर वसुलीसाठी कठोर कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. मात्र, गेल्या १४ वर्षापासून दस्तुरखुद्द मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्याच बंगल्याची ४.५६ लाख रुपये मालमत्ता कर थकल्याची बाब माहिती अधिकार कायद्याअंतर्गत मिळालेल्या माहितीतून उघडकीस आली आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी २९ डिसेंबर २०२३ रोजी आयुक्त कार्यालयाकडे अर्ज करून महानगरपालिका आयुक्तांनी बंगल्यावर पाणी सुविधांसाठी केलेल्या खचार्बाबतची पाच वर्षांची माहिती मागवली होती. गलगली यांचा अर्ज आयुक्त कार्यालयाने पालिकेच्या डी विभागाच्या जलखात्याकडे हस्तांतरित केला होता. तसेच, जल खात्याने संबंधित अर्ज करनिर्धारक व संकलक खात्याकडे हस्तांतरित केला. त्यानुसार गलगली यांना ३१ मार्च २०२४ पर्यंतची माहिती देण्यात आली.

## टीएमटी बसगाड्यांमध्ये आता सर्व महिलांना सरसकट सवलत; महिलांकडे ओळखपत्र, वास्तव्याचा पुरावा न मागण्याचे निर्देश



■ **ठाणे, रोहित जैसवाल :**
ठाणे महापालिका परिवहन सेवेच्या बसगाड्यांमध्ये ठाणे महापालिका क्षेत्रातील महिलांनाच तिकीटावर ५० टक्के सवलत देण्यात आली होती. त्यामुळे महिला वर्गामध्ये नाराजी व्यक्त केली जात होती. तसेच वाहक आणि महिला प्रवाशांमध्ये खटके उडत होते. अखेर ठाणे महापालिकेने हे नियम मागे घेतले असून बसगाड्यांमध्ये सर्व महिलांना सरसकट ५० टक्के सवलत देण्यात यावी असे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी परिवहन अधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच महिलांकडून वास्तव्याचा पुरावा मागू नये अशा सूचनाही त्यांनी केल्या आहेत. ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी बसगाडीतील प्रवास विनामूल्य असून त्यांना सोबत ओळखपत्र ठेवावे लागणार आहे. ठाणे महापालिकेने यंदाच्या अर्थसंकल्पात टीएमटी बसगाड्यांमध्ये महिलांना ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, ही सवलत महापालिका क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या म्हणजेच, ठाणे ते दिवा शहरातील महिलांनाच लागू करण्यात आली होती. ठाणे शहरात कल्याण, बदलापूर तसेच विविध भागातून महिला कामानिमित्ताने येत असतात. वागळे इस्टेट, कासारवडवली भागात शहरात जिल्हा शासकीय रुग्णालय आणि छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिला देखील उपचारासाठी येत असतात. ही सवलत केवळ ठाणे महापालिका हद्दीतील महिलांसाठीच असल्यामुळे हद्दीबाहेरील प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात होती. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून त्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करावा, या उद्देशाने ही सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे ती सवलत सर्वच महिलांना लागू आहे. त्याबाबत, निर्माण झालेला संभ्रम, ओळखपत्रांची तपासणी यात होणारा कालपव्यय आणि वाद यांच्या पार्श्वभूमीवर, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांना ही सवलत योजना सरसकट लागू करण्याचे निर्देश दिले.

## मुंबई विद्यापीठात मिळणार १४ अत्यावश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण




■ **मुंबई, दिगंबर जाधव :**
व्यावसायाभिमूख आणि कौशल्याधारीत अभ्यासक्रम राबविणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेत महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय कौशल्य विकास केंद्राची (टडश्ङ) स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याधारीत प्रशिक्षण तसेच रोजगार क्षमता निर्मितीसाठी मुंबई विद्यापीठाने नुकताच जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्रासोबत सामंजस्य करार केला आहे. या शैक्षणिक सामंजस्य कराराअंतर्गत गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्था प्रशिक्षण संस्था म्हणून भूमिका पार पाडणार आहे. विद्यार्थ्यांना कौशल्यांनी सुसज्ज करून आणि व्यावहारिक ज्ञान देऊन त्यांच्यातील उद्योजकता व रोजगारक्षमता वाढीसाठी महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्राअतर्गत १४ अत्यावश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्टये ठरविण्यात आली आहेत. गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात लॉजिस्टिक सप्लाय चेन मॅनेजमेंट, पेंट्स टेक्नोलॉजी, इंटेरिअर डिझाईन, ट्रॅव्हल्स अँड टूर्स मॅनेजमेंट आणि रिटेल मॅनेजमेंट अशा विविध कौशल्याधारीत आणि रोजगारक्षम अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण या संस्थेमार्फत दिले जाणार आहे. त्याचबरोबर प्लेसमेंटसाठीही सहाय्य केले जाणार आहे. हे प्रशिक्षण विनामूल्य असणार आहे. ५०० तासांच्या अवधीच्या या कौशल्याधारीत प्रशिक्षणासाठी बारावी, पदवी आणि पदव्युत्तर उत्तीर्ण विद्यार्थी नोंदणी करू शकणार असून या महिन्यांपासून हे प्रशिक्षण सुरु केले जाणार असल्याचे गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ. केयुरकुमार नायक यांनी सांगितले.

## राखीव डब्याबाबतच्या प्रस्तावाला रेल्वे मंडळांची मंजुरी, ज्येष्ठांचा रेल्वेप्रवास होणार सुखकर

■ **मुंबई, विशाल पाटील :**
महामुंबईतील ज्येष्ठ नागरिकांचा मुंबई उपनगरी रेल्वेमधील प्रवास सुखकर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मध्य-पश्चिम रेल्वेवरील लोकलच्या मालडब्यापैकी एका मालडब्यात बदल करून सुधारित डबा ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव ठेवण्याच्या प्रस्तावाला रेल्वे मंडळाने मंजुरी दिली आहे. मुंबई उपनगरी रेल्वेगाडीच्या पहिल्या आणि शेवटच्या सामान्य द्वितीय श्रेणीच्या डब्यात प्रत्येकी सात आसने ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव असतात. लोकलच्या एका गाडीत चार मालडबे असतात. गाडीच्या मध्यभागी असलेल्या मालडब्यात बदल करून तो ज्येष्ठांसाठी राखीव ठेवण्याचा प्रस्ताव मध्य-पश्चिम रेल्वेने दिला होता. रेल्वे मंत्रालयाच्या इलेक्ट्रिकल डायरेक्टोरेट विभागाने या प्रस्तावाची पडताळणी केली. यानंतर १०४ प्रवाशांच्या क्षमतेच्या राखीव डब्यांच्या बांधणीला मंजुरी दिली आहे. याची क्षमता १३ आसने आणि ९१ प्रवासी उभे अशी असणार आहे. या बदलाला संबंधित प्राधिकरणाने मंजुरी दिली, असे रेल्वे मंडळाच्या प्रवासी विपणन विभागाचे संचालक संजय मनोचा यांनी सांगितले. हे बदल न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावेत, अशा सूचना मनोचा यांनी मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. सद्यस्थितीत महामुंबईत धावणाऱ्या १२ डब्यांच्या लोकलमध्ये ८८ आसनांसह ४ प्रथम श्रेणीचे डबे असतात. ३९ आसनांचे तीन महिला डबे, दिव्यांग प्रवाशांसाठी ३८ आसनांचे दोन डबे आणि उर्वरित डबे सर्वसामान्यांसाठी राखीव आहेत. मालडबा ज्येष्ठांसाठी राखीव ठेवण्यापूर्वी मध्य रेल्वेने सर्वेक्षण केले होते. यावेळी ९० टक्के सामान्य प्रवासी आणि दहा टक्के मालवाहतूकदार असल्याचे आढळले, असे रेल्वेने स्पष्ट केले आहे. मालडब्यातील मालवाहकांचे प्रवासी भारमान अत्यंत कमी असल्याने एक मालडबा ज्येष्ठांसाठी राखीव ठेवण्याची तयारी रेल्वे प्रशासनाकडून दर्शवण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांच्या रोजच्या लोकल प्रवासातील अडचणी लक्षात घेऊन मर्यादित आसनांच्या मुद्द्यांवरून मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने मध्य आणि पश्चिम रेल्वेला विचारणी केली. त्यावेळी मालडब्यांचा वापर कमी असल्याने एका मालडब्याचे ज्येष्ठांसाठीच्या डब्यांमध्ये रुपांतर करण्याचे नियोजन असून याचा प्रस्ताव रेल्वे मंडळात मंजुरीसाठी पाठवण्यात आल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते.




## ठाण्यात महानगरपालिकेच्या 'मूकबधीर बालक मुक्त ठाणे' योजनेचा शुभारंभ




■ **ठाणे, प्रतिनिधी :**
ठाणे महापालिका हद्दीत एकही बालक मूकबधीर राहणार नाही. या उद्देशाने ठाणे महापालिकेने पावले उचलली आहेत. त्यानुसार मूकबधीर बालक मुक्त ठाणे ही योजना राबविली जाणार असल्याची माहिती महापालिकेने दिली. या संदभार्तील खर्चाच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मूकबधीर मुलांच्या उपचारासाठी ४ कोटी १६ लाख २५ हजार रुपयांच्या खचार्ला मान्यता देण्यात आली आहे. ठाणे महापालिका हद्दीत दरवर्षी २२ हजार ते २५ हजार नव्या बालकांचा जन्म होत आहे. त्यातील अंदाजे दरवर्षी २५ ते ५० बालकांमध्ये कर्णदोष आढळून येऊ शकतो असे पालिकेचे म्हणने आहे. त्यामुळेया बालकांमध्ये कर्णदोषाचे निदान वेळेतच होणे अपेक्षित आहे. वयाच्या दोन किंवा तीन वर्षापर्यंत बालकास ऐकू येत नसेल तर त्याची बोलण्याची क्षमती विकसित होत नाही. तसेच वयाच्या पाच वर्षापर्यंत ही क्षमता शून्य होऊन जाते व योग्य वेळेत उपचार न झाल्यास बालक मूकबधीर राहते. त्यामुळे वेळीच याचे निदान झाल्यास त्यावर उपचार करुन तो बालक बोलू शकतो. त्यामुळेच ही योजना पालिकेने पुढे आणली आहे. त्यानुसार आता टप्यानुसार महापालिकेने या संदभार्तील कार्यवाही हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका हद्दीत जन्माला येणाऱ्या नवजात बालकांची कर्णदोष चाचणी करणे, तपासणीत बालकांचे म्हणजेच श्रवण क्षमतेचे सखोल मुल्यमापन करणे, दोष आढळल्यास त्यासाठी पुढील नियोजन आखणे, नवजात बालकांच्या दोन्ही कानामंध्ये कर्णदोष आढळल्यास त्याच्यासाठी शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या खचार्चे नियोजन करणे, त्यानुसार खाजगी रुग्णालयात त्यासाठी महापालिका ४ लाख ५० हजार पर्यंत अर्थसहाय्य देणार, शस्त्रक्रियेनंतर बोलण्याची क्षमती पूर्णपणे विकसित करण्यासाठी लागणारी स्पीच थेरपी आदींसह इतर उपाय महापालिका करणार आहे.

## पुण्यात मेट्रो स्थानकाबाहेर प्रायोगिक तत्त्वावर 'शेअर' रिक्षाची सुविधा



■ **पुणे, अभिजित येरुल्लू :**
मेट्रोच्या चार मुख्य स्थानकांवरून शेअर रिक्षा सुविधा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याचा निर्णय महामेट्रोबरोबर झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. यासाठीचे सर्वेक्षण पुढील आठवड्यापासून सुरू करण्यात येणार आहे. वेकअप पुणेकर या चळवळीच्या वाहतूक या विषयासंदभार्तील परिषदेत काही दिवसांपूर्वी मेट्रो स्थानकाबाहेर शेअर रिक्षा सुरूकरण्यासंदर्भात चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष, वेकअप पुणेकर अभियानाचे संयोजक मोहन जोशी आणि रिक्षा पंचायतीचे सरचिटणीस नितीन पवार यांच्या पुढाकाराने महामेट्रो आणि रिक्षा पंचायत यांची एकत्रित बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय झाला असून महामेट्रोकडून त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे जोशी यांनी सांगितले. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि जनसंपर्क विभागाचे हेमंत सोनावणे, तसेच मेट्रो मार्गावरील पौड रस्ता, शिवाजीनगर, राजा बहादूर मोतीलाल मिल (बंडगार्डन) रस्ता परिसरातील रिक्षा पंचायतीचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते. मुंबईमध्ये लोकल ट्रेन स्थानकाबाहेर शेअर रिक्षांची रांग दिसते. तशी रांग मेट्रो स्टेशन बाहेर दिसत नाही. शेअर रिक्षा वापरासाठी पुणेकरांची मानसिकता तयार करण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली.

# पेरूचे आरोग्यदायी सरबत

**साहित्य :** एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

**कृती :** पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून



# सुंदर लिप्ससाठी टिप्स !

**आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.**



**तुम्हाला** तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

■ रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

■ बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

■ डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

■ जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

■ जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

■ बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.

# उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी



**वजन कमी होतं**

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

**चयापचय क्षमता वाढेल**

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

**खाण्यावर नियंत्रण**

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

**विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते**

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.

# खानपानच्या ५ असंगत जोड्या सेवन करताना काळजी घ्या

**खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.**

**आंबा आणि काकडी**

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

**डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक**

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

**दूध आणि डाळी**

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

**भोजनासह फिजी ड्रिंक्स**

फिजी व काबोर्नेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्‌भवू लागतात.



# बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

**मुलांच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे म्हणून बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.

**मसाजचे फायदे-**

■ मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

■ दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

■ मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

■ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

■ मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

■ मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

■ मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.



# पॅनकार्डमधील या दोन चुका पडतील भारी, १० हजारांचा दंड आणि ६ महिन्यांची शिक्षा

**पॅन कार्डला आधार कार्ड लिंक करण्यासाठी ३१ मार्च २०२३ पर्यंत डेडलाइन दिली आहे. ३१ मार्चआधी तुम्ही जर हे काम केले नाही तर तुम्हाला चांगलेच महागात पडू शकते. कारण, काही गोष्टी या तुम्हाला माहिती असणे आवश्यक आहे. जाणून घ्या डिटेल्स.**

**गेल्या** काही दिवसांपासून सतत ऐकायला मिळत आहे. पॅनकार्डला आधार कार्डशी लिंक करणे गरजेचे आहे. ही लिंक करण्याची अखेरची तारीख ३१ मार्च २०२३ आहे. आता पॅन संबंधी आणखी एक माहिती समोर येत आहे. जर कुणी सरकारच्या या आदेशाचे पालन केले नाही तर त्याला मोठा दंड भरावा लागू शकतो. जर तुम्ही सरकारकडून देण्यात आलेल्या आदेशाला मानले नाही ज्याला पॅन आणि आधार कार्डला लिंक करण्यास सांगितले आहे. असे करणे बंधनकारक आहे. परंतु असे केले नाही तर तुम्हाला दंड भरावा लागू शकतो.

**१० हजारांचा दंड**

इनकम टॅक्स डिपार्टमेंटच्या माहितीनुसार, जर तुम्ही ३१ मार्च आधी आधार पॅनला लिंक केले नाही तर त्या व्यक्तीला १० हजार रुपयांचा दंड भरावा लागू शकतो. तसेच ३१ मार्चनंतर ज्यांचे पॅन आणि आधार लिंक होणार नाहीत. त्या पॅन कार्डला बंद केले जाईल. त्यामुळे तुमचे पॅन कार्डचे सर्व कामे खोळंबली जाऊ शकतात. त्यामुळे तुम्ही ही कामे तत्काळ करून घ्यायला हवीत.




**जेलही होऊ शकते**

जर तुमच्याकडे दोन पॅन कार्ड सापडले तर तुम्हाला जेलची हवा सुद्धा खावी लागू शकते. असे करणे गुन्हा आहे. जर तुमच्याकडे दोन पॅन कार्ड असल्यास तुम्हाला एक पॅन कार्ड सरेंडर करावे लागेल. जर तुम्ही असे केले नाही तर तुम्हाला यासाठी ६ महिन्यांची जेलची शिक्षा होऊ शकते.

# सूर्य देवाचा जन्म कसा झाला?

हिंदू धर्मात पंचदेवांपैकी एक सूर्य देव मानले जातात . ज्योतिष शास्त्रातही सूयार्चं मोठं महत्त्व आहे. ज्योतिषनुसार सूयार्ला ग्रहांचा राजा मानलं जातं. हा मनुष्याच्या जीवनात मान-सन्मान, पिता-पुत्र आणि यशकारक मानला जातो. ज्योतिषनुसार सूर्य दर महिन्यात एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो. या प्रकारे बारा राशींमध्ये सूर्य एक वर्षात आपलं चक्र पूर्ण करतो सूयार्ला आरोग्य देवता मानलं जाते. सूर्य प्रकाशानेच पृथ्वीवर जीवन शक्य आहे. सूयार्ला प्रतिदिन जल अर्पण केल्याने भक्ताला आध्यात्मिक लाभ प्राप्त होतो. सोबतच आरोग्य लाभही प्राप्त होतो. पण, काय तुम्हाला माहिती आहे का सूर्य देवाचा जन्म कसा झाला होता. जाणून घ्या सूर्य देवाच्या जन्माची पौराणिक कथा. सूर्य देवाच्या जन्माची पौराणिक कथा पौराणिक कथेनुसार, पहिले हे संपूर्ण जग प्रकाशरहित होतं. त्यावेळी कमलयोनी ब्रह्माजी प्रकट झाले. त्यांच्या मुखातून प्रथम शब्द ॐ निघाला जो सूर्याच्या तेज रुपी सूक्ष्म



रुप होता. त्यानंतर ब्रह्माजींच्या चार मुखातून चार वेद प्रकट झाले जे ॐ च्या तेजात एकाकार झालेत. ही वैदिक तेजचं आदित्य आहे जो विश्वाच्या अविनाशाचं कारण आहे. हा वेद स्वरुप सूर्यच सृष्टीच्या उत्पत्ती, पालन आणि संहारचं कारण आहे. ब्रह्माजींच्या प्रार्थनेने सूयार्ने आपल्या महातेजाला अकत्र करुन स्वल्प तेजाला धारण केलं. सृष्टीच्या रचनेवेळी ब्रह्माजींचे पुत्र मरीची झाले ज्यांचे पुत्र ऋषी कश्यप यांचा विवाह अदितिसोबत झाला. अदितिने घोर तपस्या करुन भगवान सूयार्ला प्रसन्न केलं. ज्यांनी तिच्या ईच्छापूतीर्साठी सुषुम्ना नावाची किरणेच्या रुपात त्यांच्या गर्भात प्रवेश केला. गर्भावस्थातही अदिति चान्द्रायण सारखे कठीण व्रतांचं पालन करत होत्या. तेव्हा ऋषी राज कश्यप यांनी क्रोधित होऊन अदितिला म्हटलं की, तू याप्रकारे उपवास ठेवून गर्भस्थ बाळाचा जीव का घेतेय. हे ऐकून देवी अदितिने गर्भातील बालकाला आपल्या उदरातून बाहेर काढलं जो आपल्या अत्यंत दिव्य तेजाने प्रज्वलीत होत होता. भगवान सूर्य बाळाच्या स्वरुपात त्या गभार्तून प्रकट झाले. अदितिला मारिचम-अन्डम म्हटलं जाण्याचं कारण म्हणजे हे बालक मार्तंड नावाने प्रसिद्ध झाला. ब्रह्मपुराणमध्ये अदितिच्या गभार्तून जन्मलेल्या सूर्याच्या अंशाला विवस्वान म्हटलं गेलं. सूर्यदेवता : सूर्य हा रात्रीचा अंधार संपवून प्रकाशाकडे नेणारा असल्यामुळे, त्याचप्रमाणे त्याच्या झगझगीत, तेजस्वी रुपामुळे मानवाला वंद्य वाटत आलेला आहे आणि त्या भावनेतून अनेक संस्कृतींनी सूयार्ला देवता मानलेले आहे. उघड्या डोळ्यांनी जगाकडे पाहणारा सूर्य हा कठोर न्यायदाता, तो प्रज्ञेचा स्रोत, तो सार्वभौम, तो परोपकारी अशी भावना सूर्याबद्दल व्यक्त केली जाते. प्राचीन ईजिप्तमध्ये सूर्यदेवतेचे नाव 'रा' (रे) असे होते. ईजिप्शियन संस्कृतीतील देवताविश्वात 'रा' एक प्रभावी देवता होती. एका प्राचीन ईजिप्शियन मिथ्यकथेत तरुण सूर्यदेव स्वर्गीय सागरावरुन जलपर्यटनास निघतो. माध्यान्हीला तो शेखरबिंदूच्या ठिकाणी दृश्यमान होतो, तेव्हा त्याचे बिंब पूर्ण विकसित स्वरुपात असते. तो 'रा' झालेला असतो आणि संध्याकाळी पश्चिमेस तो वृद्ध सूर्यदेवाचे - अतुमचे - रुप धारण करतो, असे दाखविलेले आहे. सुमेरियन आणि अकेडियन धर्मात सूर्यदेवतेला मध्यवर्ती स्थान आहे. इंडो-यूरोपीय संस्कृतीत सूर्य ही अत्यंत लोकप्रिय देवता होती किंबहुना सूर्य हे ईश्वरी शक्तीचे प्रतीक होते. मध्ययुगीन इराणमध्ये इस्लामपूर्व काळापासूनचा सांस्कृतिक वारसा म्हणून सूर्योत्सव साजरे केले जात. कुष्ठरोग ही सूर्य-देवतेने, तिच्या बाबतीत केलेल्या पापाबद्दल माणसाला दिलेली शिक्षा होय, अशी समजूत पर्शियनांमध्ये असल्याचे प्राचीन ग्रीक इतिहासकार हीरॉडोटस ह्याने नमूद केले आहे. चार शुभ्र घोड्यांच्या रथातून भ्रमण करणाऱ्या सूर्यदेवतेची कल्पना इंडो-यूरोपीय संस्कृतीत आहे. रोमनांच्या इतिहासातील उत्तर कालखंडात सूर्यपूजेला फार महत्त्व आले होते. उत्तर अमेरिकन इंडियन लोक सूयार्ला सर्व प्रमुख देवता मानीत. वैदिक साहित्यात ऋग्वेदातील सूर्यदर्शन काही सुंदर ऋचांमधून प्रकट झाले आहे. त्यांतील काही ऋचांचा आशय असा : (१) सर्वांना दिसण्यासाठी त्या सर्वदर्शी सूर्यदेवाला किरण वाहून आणत आहेत . (२) सर्वदर्शी सूर्यापुढे नक्षत्रे काळोखासह चोराप्रमाणे पळून गेली आहेत. (३) देवांचे सुंदर मुख, वरुणाचा व अग्नीचा डोळा, स्थावरजंगमांचा जीव उगवला आहे . आकाश, पृथ्वी व अंतरिक्ष यांना त्याने भरुन टाकले आहे. (४) पुरुषाने युवतीच्या मागे लागावे, तसा सूर्य शोभिवंत उषादेवीच्या मागे लागला आहे. या देवाची पूजा करीत, माणसे ह्या कल्याणप्रद देवाकरिता मंगल मार्गाने आपल्या पिढ्यांचा विस्तार करीत असतात (५). वैदिक साहित्यात सूयार्ला सवितृ, विवस्वत, पूषन अशी विविध नामे दिली आहेत. सूर्याच्या विविध अवस्थांना प्रतीकरुप मानून अशी निरनिराळी नावे सूयार्ला दिली असणे शक्य आहे. उदा., सायणभाष्यानुसार ऋग्वेदात उगवत्या सूर्याला सवितृ म्हटले आहे. ऋग्वेदात सूर्याला विश्वाचा आत्मा म्हटलेले आहे. सूयोर्पासना भारतात प्राचीन काळापासून रुढ आहे. सूर्योपासनेसंबंधीचा विश्वामित्र ऋषींचा गायत्री मंत्र प्रसिद्ध आहे. उपनिषदांपैकी सूर्योपनिषद सूयोर्पासनेशी संबंधित आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | 4 | | | | 7 | |
| | | | 1 | | 5 | | 9 | 6 |
| | | 9 | | 7 | 8 | | | |
| | | 5 | | 4 | 1 | | 8 | |
| | | | | | 2 | 4 | | |
| 2 | | 7 | | | | 1 | | |
| 4 | | | 9 | | | 3 | 1 | |
| | | | | | 4 | | | |
| 6 | 8 | 1 | 3 | | | | 4 | |

## उत्तर सुडोकू -३३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 3 | 5 | 6 | 8 | 7 | 1 | 4 | 2 |
| 2 | 4 | 6 | 1 | 9 | 5 | 8 | 3 | 7 |
| 8 | 1 | 7 | 2 | 3 | 4 | 6 | 5 | 9 |
| 1 | 8 | 2 | 3 | 4 | 6 | 9 | 7 | 5 |
| 3 | 5 | 9 | 7 | 1 | 8 | 2 | 6 | 4 |
| 6 | 7 | 4 | 9 | 5 | 2 | 3 | 1 | 8 |
| 4 | 6 | 1 | 5 | 2 | 9 | 7 | 8 | 3 |
| 5 | 9 | 3 | 8 | 7 | 1 | 4 | 2 | 6 |
| 7 | 2 | 8 | 4 | 6 | 3 | 5 | 9 | 1 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

**१७ मार्च**

- १९५७: व्हॅनगार्ड-१ या अमेरिकेच्या पहिल्या सौरउर्जाचलित उपग्रहाचे प्रक्षेपण झाले.
- १९६९: गोल्ड मायर ह्या इस्त्रायेलच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री बनल्या.
- १९९७: मुंबई मध्ये वातानुकुलीत टॅक्सी सेवेला सुरवात झाली.
- १८६४: भारतीय अभियंता जोसेफ बाप्टीस्ता यांचा जन्म.
- १९०९: भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक रामचंद्र नारायण दांडेकर यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर २००१)
- १९२०: बांगलादेशचे संस्थापक व पहिले राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबुर रहमान यांचा जन्म. (मृत्यू: १५ ऑगस्ट १९७५)
- १९२७: स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पुत्र विश्वास यांचा जन्म.
- १९७५: भारतीय अभिनेता, गायक पुनीथ राजकुमार यांचा जन्म.
- १९७९: अभिनेता शर्मन जोशी यांचा जन्म.
- १२१०: आदिनाथ संप्रदायाचे प्रवर्तक मत्स्येन्द्रनाथ (मच्छिंद्रनाथ) यांनी सातारा जिल्ह्यात मत्स्येन्द्रगड येथे समाधी घेतली.
- १७८२: डच गणितज्ञ डॅनियल बर्नोली यांचे निधन. (जन्म: ८ फेब्रुवारी १७००)
- १८८२: आधुनिक मराठी गद्याचे जनक, ग्रंथकार आणि केसरीचे एक संस्थापक विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचे निधन. (जन्म: २० मे १८५०)
- १९१०: समाजसेविका अनुताई वाघ यांचे निधन. (जन्म: २७ सप्टेंबर १९९२)
- १९३७: बडोद्याचे राजकवी चंद्रशेखर शिवराम गोंहे यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १८९१)
- १९५६: नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ आयरिन क्यूरी यांचे निधन. (जन्म: १२ सप्टेंबर १८९७)
- १९५७: फिलिपाइन्सचे ७ वे राष्ट्राध्यक्ष रॅमन मॅगसेसे यांचे निधन. (जन्म: ३१ ऑगस्ट १९०७)
- २०००: पार्श्वगायिका व अभिनेत्री राजकुमारी दुबे यांचे निधन.

## भविष्य

**मेष** तुमचा इतरांवर प्रभाव राहील. व्यवसायात नवीन तंत्र व मंत्र अंमलात आणू शकाल. वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**वृषभ** महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील.

**मिथुन** वाहने जपून चालवावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क** राजकीय क्षेत्रात सहभागी व्हाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. तुमच्या कार्यक्षेत्रात मानसन्मान, प्रतिष्ठा लाभेल. शासकीय कामे मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल.

**सिंह** एखादी गुप्त वार्ता समजेल. हितशत्रुंचा त्रास संभवतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल. भागीदारी व्यवसायातील निर्णय मार्गी लागतील.

**कन्या** मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**तुला** प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वादविवाद टाळवेत. इतरांच्या सहकायार्ची अपेक्षा नको. एखादी महत्त्वाची वार्ता समजेल.

**वृश्चिक** जिद्दीने कार्यरत रहाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. वरिष्ठांबरोबर मतभेदाची शक्यता. महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल.

**धनु** आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. मनोबल उत्तम राहील. वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. नोकरी, व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील.

**मकर** आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील. वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता.

**कुंभ** काहींना कामाचा ताण व दगदग जाणवेल. मानसिक अस्वस्थता जाणवेल. अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मीन** मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल. महत्त्वाचे पत्र व्यवहार पार पडतील. वादविवाद टाळवेत. शासकीय क्षेत्रात सुसंधी लाभेल. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मनोरंजनाकडे कल राहील. प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# ....तो सूर बने हमारा!

तो होता १५ ऑगस्ट १९८८ चा स्वातंत्र्य दिन. दिल्लीच्या लाल किल्ल्यावरील पंतप्रधानांचे भाषण दूरदर्शनवरून प्रसारित झाल्यानंतर पीयूष पांडे यांनी लिहिलेले, अशोक पत्की यांनी संगीत दिलेले आणि पं. भीमसेन जोशी, एम. बालमुरलीकृष्ण, लता मंगेशकर यांच्यासह काहींनी गायलेले मिले सूर मेरा तुम्हारा हे गाणे दूरदर्शन वरून प्रदर्शित झाले आणि त्याने अवघ्या देशाला अक्षरशः वेड लावले. कला, क्रीडा यांसह वेगवेगळ्या क्षेत्रांतले त्या काळातले नामवंत त्या गाण्यात आपल्या देशात असलेल्या विविधतेतील एकतेबद्दल इतक्या सहजपणे सांगतात की तसे कुणी त्याआधी ऐकले-बघितले नव्हते. जेमतेम ३५ वर्षांपूर्वी या देशात, आपल्या आसपास असे काही घडत होते, सगळ्या देशाचे शरीर आणि आत्मा एकच आहे असे वाटावे असे काही वातावरण होते यावर आज कुणी तरी विश्वास ठेवेल का, या प्रश्नाचे उत्तर नाही, असेच द्यावे लागेल, असे बरेच काही आज घडताना दिसत आहे. जेमतेम ३५ वर्षांत एवढे होत्याचे नव्हते व्हावे एवढी मजल आपण मारली आहे, एवढाच त्याचा अर्थ. त्यातलीच एक घटना समाजमाध्यमांवरची. एरवी या माध्यमांवरचे ट्रोलिंग आणि तिथले जल्पक ही शहाण्यासुरत्या माणसाने दखल घेऊच नये अशी गोष्ट. पण आपल्या समाजाचा सध्याचा चेहरा जणू आरशातून पाहावे तसा दाखवणाऱ्या या एका घटनेने समाजामधले सगळेच सूर कसे विस्कटले आहेत, हे उघड केले. झाले असे की खाद्यपदार्थ, पाककृतीविषयक एका समाजमाध्यमी समूहामध्ये एक कल्पना मांडली गेली. रमजानचा महिना सुरू झाला आहे, तर आपण या समूहावर या काळात केल्या जाणाऱ्या आपल्याला माहीत असलेल्या पदार्थांची माहिती एकमेकांना देऊ. ज्यांना शक्य असेल, इच्छा असेल ते हे पदार्थ करून बघतील. या आवाहनानुसार एका महिला सदस्याने एका पदाथार्ची पाककृती सचित्र सादर केली. समाजमाध्यमांवर चालणाऱ्या अनेक गोष्टींमधली ही खरे तर एक अगदी सरळसाधी गोष्ट. पण कावीळ झालेल्या रोग्याला सगळेच पिवळे दिसते असे म्हणतात, तसे झाले आणि एका साध्या खाद्यपदाथार्ची माहिती इतरांना देऊ पाहणाऱ्या या महिला सदस्याला त्या समूहाबाहेरच्या लोकांनी प्रचंड प्रमाणात त्रास देणे आरंभले. संबंधित व्यक्तीला शिव्याशाप दिले गेले. धमक्या दिल्या गेल्या. ती आता दुसऱ्या धर्मात जाणार अशी आवई उठवली गेली. दिवसभर हा प्रकार सुरू होता. पण नंतर संबंधित महिला सदस्याने एक मोठी पोस्ट लिहून आपण कुणाला घाबरून मागे हटणार नाही, ही भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर त्यांना पाठिंबा देण्यासाठी अनेकांनी तो पदार्थ करून त्याची छायाचित्रे सादर केली. अनेकांनी इतर धर्मांमधली आपली मित्रमंडळी, सुहृद, त्यांच्याबरोबरचे आत्मीय संबंध, त्यांच्याबरोबर होणारी खाद्यसंस्कृतीमधली देवाणघेवाण याबद्दलचे अत्यंत हृद्य अनुभव मांडले. एकूण काय तर एखाद्या धर्मसमूहाबद्दलचा टोकाचा द्वेष आणि समंजस, मानवी स्वीकार या दोन्हींचे दर्शन या एका प्रकरणातून घडले. ही द्वेषाची लाट आणि तिला प्रेमाचे उत्तर हे सगळे आजकाल घडते त्याप्रमाणे दोनचार दिवस विहरत राहिले आणि मग ओसरले. पण त्यामुळे अनेकांच्या मनाला झालेली जखम आणि तिचा व्रण याचे काय करणार? त्याचे काय करायचे असते? मुळात आपण कुणाचा तरी द्वेष करतो तो का? आणि द्वेष करतो म्हणजे नेमके काय करतो? विशिष्ट धर्मीयांचा द्वेष करणारे अनेक जण आपल्या उभ्या आयुष्यात त्या विशिष्ट धर्मातल्या एकाही व्यक्तीला कधीही भेटलेले नसतात आणि हे त्यांच्या गावीही नसते. कुणी तरी त्यांच्या मनात पेरून दिलेल्या द्वेषाच्या बियांना रुजून आलेली विखारी फळे या आपल्या खऱ्या भावना नाहीत, हेही त्यांना समजत नाही. इतिहासात जे झाले त्याचा आधार घेऊन वर्तमान बिघडवायचे आणि भविष्य नासवायचे नसते, हजारभर वर्षांपूर्वीच्या कुणाच्या कृत्याचा आजच्या घडीला सूड उगवायचा नसतो हे त्यांना कुणी सांगितलेलेच नसते. आणि हेही सांगितलेले नसते की लाखो वर्षांच्या मानवी इतिहासात धर्मसंस्कृतीच्याही आधीपासून खाद्यसंस्कृती आहे. शिकार आणि कंदमुळांपासून सुरुवात करून माणूस आज खाद्यसंस्कृतीच्या प्रगत अशा टप्प्यावर आहे. तिच्यावर कोणत्याही धमार्चे शिक्के मारण्यापेक्षा त्यातली देवाणघेवाण हाच अधिक सुसंस्कृत आणि रसिक मार्ग आहे. कारण अन्नधान्य पिकवण्यापासून त्याचे विशिष्ट खाद्यपदार्थ रांधण्यापर्यंतच्या कोणत्याही प्रक्रियेवर आजच्या मानवाचा एकशतांशानेही स्वामित्वहक्क नाही. त्यामुळे आपल्या पूर्वजांनी आपल्यापर्यंत पोहोचवलेले पाककलेसह सर्व प्रकारच्या कलासंस्कृतींचे संचित स्वीकारणे आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे याशिवाय आपल्या हातात काय उरते? माणसाच्या भरणपोषणासाठी खाद्यपदार्थ असतील तर त्यांना धर्म कसा असू शकतो? आणि तो आहे, असे मानले तर आज आपलेच जगणे अवघड होऊन बसेल त्याचे काय? तसे असेल तर बियाणी बाद करून वरण-भातावर समाधान मानावे लागेल. समोशांवर काट मारावी लागेल. बटाटा, टोमॅटो, हिरवी मिरची हे पदार्थ तातडीने बंद करून दुधी, भोपळा, घोसाळे या आपल्या भाज्याच नित्यनेमाने खाव्या लागतील. साबुदाणा वर्ज्य करून उपवास करावा लागेल. चहा-कॉफी सोडून द्यावी लागेल. पाव-बिस्किटे-केक यांनी किती जणांना बाटवले होते याचा इतिहास फार जुना नाही. त्यामुळे त्यांना तर हातही लावता येणार नाही. आज गल्लोगल्ली मिळणारे आणि आवडीने खाल्ले जाणारे चायनीजदेखील आपले नाही, हे आवर्जून लक्षात ठेवावे लागेल. आहे का हे सगळे शक्य? म्हणूनच थोडा विचार करायला हवा. हजारभर वर्षांच्या काळात झालेली वेगवेगळी आक्रमणे, या आक्रमकांनी केलेला विध्वंस हा आपला अतिशय वेदनादायक इतिहास आहे, यात शंकाच नाही. पण हा इतिहास कुणी तरी चिघळवते आहे म्हणून आपण त्याला बळी पडायचे का? जगात इतरत्र जिथे जिथे इस्लामी आक्रमणे झाली, तिथे तिथे तिथली स्थानिक संस्कृती नष्ट झाली.

# म्हातारे तितुके..



अमेरिकेच्या इतिहासातील दोन्ही सर्वाधिक म्हाताऱ्या अध्यक्षीय उमेदवारांची सत्तेची भूक उच्च कोटीची आहे आणि त्यासाठी निवडणूक लढवण्याची ऊर्जा अक्षय्य. पायऱ्या चढताना-उतरताना काही वेळा धडपडणारा, भाषण करताना शब्दांचे विस्मरण होणारा सहस्राचंद्रदर्शनोत्तर विद्यामान अध्यक्ष एकीकडे आणि निवडणुकीला केवळ सत्तासोपानापर्यंत पोहोचण्याची शिडी मानणारा आणि कायद्याच्या नि कर्जफेडीच्या कचाट्यातून सुटण्यासाठी(च) व्हाइट हाऊसचा आसरा शोधणारा, पत्नीच्या नावाचा उच्चार मर्सिडीज असा करणारा अमृत महोत्सवोत्तर प्रतिस्पर्धी दुसरीकडे जगातील सर्वशक्तिमान लोकशाही देशाला त्यांचा सर्वशक्तिमान अध्यक्ष निवडण्यासाठी अशा दोघांपलीकडे उमेदवार सापडू नये, ही म्हटले तर शोकान्तिका, म्हटला तर विनोद. अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी दुसऱ्यांदा जो बायडेन आणि डोनाल्ड ट्रम्प या दोहोंमध्ये लढत होईल, हे काही दिवसांपूर्वीच स्पष्ट झाले होते. परवाच्या काही पक्षांतर्गत निवडणुकांपश्चात त्यावर शिक्कामोर्तब झाले. ट्रम्प (वय वर्षे ७७) आणि बायडेन (वय वर्षे ८१) हे अशा रीतीने अमेरिकेच्या इतिहासातले सर्वाधिक म्हातारे अध्यक्षीय उमेदवार ठरतात. पण दोघांचीही सत्तेची भूक उच्च कोटीची आहे आणि त्यासाठी निवडणूक लढवण्याची ऊर्जा अक्षय्य आहे. दोन्ही गुण कौतुकास्पदच. लोकशाही, अमेरिका आणि एकंदरीत मानवजातीविषयी दोहोंची मते दोन ध्रुवांवरची आहेत. पण ते महत्त्वाचे नाही. त्याहीपेक्षा दखलपात्र ठरते, दोघांनाही सध्याच्या घडीला जवळपास प्रत्येकी निम्म्या अमेरिकी मतदारांचा पाठिंबा आहे, ही बाब. साधारण अशी परिस्थिती गेल्या निवडणुकीतही दिसून आली होती. यंदा हे ध्रुवीकरण अधिक ठळक झाल्याचे आढळते. म्हणजे जो कोणी अध्यक्ष म्हणून निवडून येईल, तो अमेरिकेच्या जवळपास अर्ध्या पात्र मतदारांचा विलक्षण नावडता असेल. दोन्ही नेत्यांनी गेल्या महिना-दीड महिन्यामध्ये बहुतेक सर्व पक्षांतर्गत निवडणुका आणि मेळाव्यांमध्ये फारशा आव्हानांविना विजय मिळवला. बायडेन यांची या स्पर्धेतली दौड ट्रम्प यांच्यापेक्षाही अधिक यशस्वी ठरली. विद्यमान अध्यक्ष निवडणूक लढवण्यास इच्छुक असेल तर त्याला विरोध करणे सहसा टाळावे, या अमेरिकी राजकारणाच्या अलिखित पैलूचा फायदा बायडेन यांना झाला. तर ज्याने गत निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला जवळपास विजयाच्या काठावर नेले, त्याच्या ताकदीचा दुसरा उमेदवार नसल्यामुळे स्वतःच्या पायावर धोंडा का मारून घ्या, असा विचार रिपब्लिकन नेत्यांनी आणि पक्षसदस्यांनी ट्रम्प यांना उमेदवारी देताना केला. या घडामोडी एका अत्यंत कळीच्या मुद्द्यापाशी येऊन थांबतात. तो मुद्दा म्हणजे सक्षम, सशक्त पर्यायाचा. सर्वप्रथम ट्रम्प यांच्याविषयी. ज्यांच्याविरोधात चार फौजदारी खटले दाखल झाले आहेत, असे ट्रम्प अमेरिकी अध्यक्षांच्या मांदियाळीतील एकमेवाद्वितीय. त्यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात दोन वेळा त्यांच्याविरोधात अमेरिकी काँग्रेसमध्ये महाभियोग आणला गेला. असा पराक्रम करणारेही ते एकमेव. या चार फौजदारी खटल्यांपैकी एक अतिशय गंभीर स्वरूपाचा आहे. २०२० मधील अध्यक्षीय निवडणूक निकालात हस्तक्षेप करताना, अमेरिकी काँग्रेस आणि अमेरिकी संविधानाविरोधात उठाव केल्याचा आरोप या प्रकरणात आहे. ६ जानेवारी २०२१ रोजी रिपब्लिकन टोळीवाल्यांना कॅपिटॉल इमारतीवर चाल करून जाण्यास ट्रम्प यांनी चिथावले, या आरोपाची सुनावणी येत्या काही दिवसांत सुरू होईल. परंतु ट्रम्प यांनी या खटल्यांना बगल देण्याचे विविध मार्ग शोधून काढले आहेत. लोकशाही देशांमध्ये न्यायदान प्रक्रिया नेहमीच स्वतःचा असा वेळ घेत मार्गक्रमण करते. या गतीचा फायदा ट्रम्प उठवत आहेत. कायद्यासमोर वेळकाढूपणा करण्याचे तंत्र त्यांना फार पूर्वीपासून अवगत आहे. तशात अमेरिकी न्यायव्यवस्था आणि त्यातही सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे राजकीय असणे ट्रम्प यांच्यासारख्यांच्या पथ्यावर पडते. विशिष्ट विचारसरणीचे न्यायाधीश त्या विचारसरणीच्या अध्यक्षाला सहसा अडचणीत आणत नाहीत, हे अमेरिकी व्यवस्थेला ज्ञात होते. त्याचा असा गैरवापर ट्रम्प यांच्यासारखे घेतील, याची मात्र फारशी कल्पना बहुतांना नव्हती. कोलोरॅडो येथील सर्वोच्च न्यायालयाने संविधानाविरोधात उठाव केल्याच्या आरोपाखाली तेथील मतपत्रिकेवरून ट्रम्प यांचे नावच काढून टाकले. त्या निकालाला अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरवले. कारण तेथे रिपब्लिकन न्यायाधीशांचे प्राबल्य आहे. त्याबरोबरीनेच, अमेरिकी निवडणुकीच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करणे योग्य ठरणार नाही, असा पोक्त विचारही तेथील न्यायाधीश करतात. अशा परिस्थितीत निवडणूक निकाल मान्यच न झाल्यामुळे एका पराभूत अध्यक्षाने थेट अमेरिकी काँग्रेसवर हल्ला करण्यासाठी समर्थकांना चिथावले, तेव्हा त्याबद्दल अशा व्यक्तीस शासन झालेच पाहिजे हा विचार मागे पडू लागतो. अनेकांना हे अमेरिकी व्यवस्थेचे ठळक वैगुण्य वाटते. कारण संविधानाच्या रक्षणाची शपथ घेतल्यानंतर, त्याच संविधानाविरोधात उठाव करते किंवा उठावास चिथावणी देते अशा व्यक्तीस अमेरिकेतील कोणतेही प्रशासकीय पद भूषवण्यास अपात्र ठरवण्याची तरतूद तेथील कायद्यातच आहे. पण त्या मुद्द्यावर जोरकस भूमिका तेथील रिपब्लिकनबहुल सर्वोच्च न्यायालयाने अद्याप तरी घेतलेली नाही. ट्रम्प यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित करून सर्वच खटल्यांच्या बाबतीत गोंधळ आणखी वाढवून ठेवला आहे. तो आहे अध्यक्षांना मिळणाऱ्या घटनादत्त कायदेशीर संरक्षणाचा. म्हणजे आपण पापे केलीच नाहीत हा त्यांचा मुद्दा नाही, त्याबद्दल पश्चात्तापाचा तर प्रश्नही नाही. पण पापे केली तेव्हा अध्यक्ष होतो म्हणून कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे, असे त्यांचे ठाम मत! त्या मताचा प्रतिवाद कायदेशीर मार्गाने करायचा तर गुंतागुंत आणखी वाढणार. त्यात वेळही जाणार. हे अचूक हेरूनच ट्रम्प यांच्या चमूने प्रचाराची आखणी केलेली आहे. त्यांना रिपब्लिकन पक्षात आव्हान देणारे रॉन डेसांटिस, निकी हॅले, विवेक रामस्वामी स्वतःला ह्यट्रम्पपेक्षा अधिक ट्रम्पवादी सिद्ध करायला गेले नि सपशेल फसले. ट्रम्प यांचा मुद्देसूद प्रतिवाद करून त्यांच्या अनेक दाव्यांतला फोलपणा दाखवून देऊ शकेल असे नेतृत्वच रिपब्लिकन पक्षात गेल्या दहा वर्षांत उभे राहू शकले नाही. शिवाय ट्रम्प यांना त्यांच्या वकुबाप्रमाणे वागू देण्यात पक्षाचे फार नुकसान होत नाही हे कळून चुकल्यावर तर त्या दिशेने फार प्रयत्नही झालेले नाहीत. ट्रम्प यांच्याविरोधात उभे आहेत विद्यमान अध्यक्ष जो बायडेन. अमेरिकी राजकारणात नवीन शतकात ज्या मोजक्या विचारी राजकारण्यांचा उल्लेख करता येतो ते बहुतेक डेमोक्रॅटिक पक्षातच आढळतात. बराक ओबामा यांच्या अमदानीत बायडेन दोन वेळा उपाध्यक्ष होते. क्लिंटन दाम्पत्याचाही सहवास त्यांना लाभला आहे. परंतु अमेरिकी राजकारणात गेल्या दशकाच्या मध्यावर रौद्र बनलेल्या ट्रम्प-प्रवाहाचा सामना करण्याची क्षमता त्यांच्यात कितपत आहे, हा प्रश्न उपस्थित करता येण्यासारखी परिस्थिती आहे. राजकीयदृष्ट्या बायडेन यांना ट्रम्प यांच्याइतका व्यापक पाठिंबा आहे का हा प्रश्न. अमेरिकेचे पूर्व आणि पश्चिम किनारे हे डेमोक्रॅटिक पक्षाचे प्रभावबिंदू. गौरेतर, त्यातही आफ्रिकन-अमेरिकन, मुस्लीम आणि किनारी प्रदेशात वसलेले हिस्पॅनिक, तसेच युवा नोकरदार आणि उद्योजक हा बायडेन यांचा पारंपरिक मतदार. या मतदारांस मेक अमेरिका ग्रेट अगेनसारखी स्वप्ने भुरळ पाडत नाहीत. हा मतदार जागतिक आर्थिक चढउतारांप्रति संवेदनशील असतो. त्या आघाडीवर अमेरिकेची - म्हणजे बायडेन प्रशासनाची कामगिरी आता कुठे बरी वाटू लागली आहे. लोकशाहीबाबत डेमोक्रॅटिक पक्षाची मूल्ये आणि बायडेन यांची मते एकाच प्रतलात आहेत. पण बेभान, बेलगाम नेतान्याहूंना गाझा बेचिराख करण्यापासून परावृत्त करण्यात ते निःसंशय कमी पडले आणि यातून बायडेन यांचा पारंपरिक मुस्लीम मतदार दुखावला. हा मतदार विचारी आहे, त्यामुळे बायडेन यांच्या चुकांना सहसा माफ करणारा नाही. ट्रम्प हे चुकाच करत नाहीत, असे त्यांचा मतदार मानून चालतो. ती सवलत बायडेन यांना नाही. म्हणूनच आगामी निवडणूक त्यांच्यासाठी अधिक खडतर ठरेल.

# कल्याणच्या आधारवाडी कारागृहात सीसीटिव्ही

## महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांच्या हस्ते शुभारंभ

**कल्याण:** कल्याणमधील आधारवाडी कारागृहात सीसीटिव्ही कॅमेरे, कॉइन बॉक्स, व्हिडियो कॉन्फरन्स, ई - मुलाखत युनिट, इ - लायब्ररी या नाविन्यपूर्ण सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. राज्याचे अपर पोलीस महासंचालक आणि कारागृह सुधार सेवा विभागाचे महानिरिक्षक अमिताभ गुप्ता यांच्या हस्ते या सर्व सुविधांचा शुभारंभ करण्यात आला. यामुळे कैद्यांच्या सुविधेत आणखी वाढ झाली आहे. कॉईन बॉक्स सुविधेअंतर्गत आठवड्याला प्रत्येक कैद्याला तीन कॉल मिळणार आहेत. तर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कैद्यांना महिन्यातून एक वेळा कुटुंबासोबत आणि एकवेळा वकिलासोबत बोलता येणार आहे. राज्यातील जवळपास सर्व कारागृहांमध्ये व्हिडिओ कॉन्फरन्स सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती कारागृह महानिरिक्षक अमिताभ गुप्ता यांनी यावेळी दिली. त्याचप्रमाणे ई - लायब्ररीमुळे लायब्ररी अपडेट करता येईल आणि याचा जास्तीत जास्त लाभ कैद्यांना मिळेल. कारागृहाच्या सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण जेलमध्ये सीसीटीव्ही लावण्यात आले असून त्यामुळे अनुचित प्रकारांना आळा बसणार आहे. जेलच्या दुरावस्थेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे अमिताभ गुप्ता यांनी सांगितले. आधारवाडी कारागृहात क्षमतेपेक्षा जास्त कैदी आहेत, याबाबत ते म्हणाले, पालघरला नवीन कारागृहाच्या कामाची सुरुवात झाली आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर ठाणे आणि आधारवाडी कारागृहाचा ताण कमी होईल. तसेच अनेक घटनांचे चित्रण प्रशासनाला उपयोगी पडेल, असेही त्यांनी शेवटी सांगितले.



## कळव्यात कंपनीची भिंत घरांवर कोसळली

**मुंब्रा:** कळवा येथील समर्थ विद्यालयाच्या जवळ असलेल्या मुकुंद कंपनीची सुरक्षा भिंत मुकूंद कंपनीच्या संरक्षण भिंतीलगत असलेल्या एकविरा संकुल चाळीतील ६ घरांवर पडली तसेच एक झाड पडले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवीतहानी झाली नाही. ही भिंत सुमारे ८० फूट लांब व २० फूट उंच होती.घरांच्या भिंती व छप्पर तुटून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी,अग्निशमन दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने पडलेले झाड कापून बाजूला करण्याचे काम करण्यात आले. ६ घरांपैकी ५ घरांत २३ जण वास्तव्यास आहेत. सुदैवाने त्यांच्यापैकी कोणी जखमी झाले नाही.

# महाविकास आघाडी लोकसभा एकत्रच लढणार - खा. संजय राऊत

## वंचितला चार जागांचा प्रस्ताव



**मुंबई :** येत्या लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील जागावाटपावरून महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नसून एकत्र लढण्यावर तिन्ही पक्ष ठाम आहेत. एक किंवा दोन जागा वगळता जवळपास सर्वच जागांवर शिक्कामोर्तब झाले आहे, असे शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. महाविकास आघाडीत वंचित बहुजन आघाडी सामील आहे. चार जागांचा त्यांना प्रस्ताव दिला आहे. त्यात अकोला आणि इतर तीन मतदारसंघांचा समावेश आहे. त्यावर विचार करून त्यांनी निर्णय घ्यायचा आहे, असेही प्रकाश आंबेडकर यांच्या दाव्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी म्हटले आहे.


मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना राऊत यांनी ही भूमिका मांडली. येत्या रविवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या दादर शिवाजी पार्कातील सभेनंतर जागावाटपाची घोषणा केली जाईल, असा दावाही त्यांनी केला आहे. आघाडीतील जागावाटप पूर्ण झाले आहे. कार्यकर्त्यांच्या दबावामुळे एक-दोन जागांवर वाद असतो. नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांमध्ये जास्त खेचाखेच होत असते. त्यामधून खेळ सुरू होतो. परंतु वरिष्ठ पातळीवर कोणतेही मतभेद नाहीत. सगळे एकत्र लढण्यावर ठाम आहेत.

सर्वांचे एकमत सुद्धा झाले आहे, असे राऊत म्हणाले. वंचितने आम्ही दिलेल्या प्रस्तावाबाबत निर्णय घ्यायचा आहे. मात्र समाजमाध्यमातून आघाडीच्या जागावाटपाची चर्चा होत नाही. आम्ही कधीही केली नाही आणि करतसुद्धा नाही, असा खोचक सल्ला राऊत यांनी दिला. आघाडीत एमआयएमचा समावेश झालेला नाही, असेही राऊत यांनी स्पष्ट केले.

भाजपला अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या पक्षांच्या पाठीशी दलित, वंचित व मुस्लिम मतदार उभे राहणार नाहीत, असे राऊत म्हणाले. ज्यांनी या देशाला संविधान दिले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या नावाने राजकारण करणारे कोणीही असू देत त्यांनी डॉ. आंबेडकरांना लहान करू नये, ही त्यांच्या समाजाची भावना आहे, हे सगळ्यांनी समजून

# NI Act | Director Not Responsible For Day-To-Day Affairs Of Company Can't Be Held Liable For Cheque Dishonour: Supreme Court

**Mumbai :** The Supreme Court in one of the latest hearing observed that the Director of the company, responsible for its day-to-day affairs cannot be held liable for dishonor of cheque under the Negotiable Instruments Act,1882. Reversing the High Court's order which had refused to quash the pending proceedings under Section 138 N.I. Act against the accused/director of the company, the Bench comprising Justices B.R. Gavai and Sandeep Mehta observed that for making the director of the company to be liable for the offences committed by the Company under Section 141 of the Act, there must be specific averments against the Director showing as to how and in what manner the Director was responsible for the conduct of the business of the Company.




The court also held that the director of the company could not be held liable for the dishonor of the cheque if the complainant failed to prove the involvement of the director in the day-to-day affairs of the company.

In the instant case, the complainant registered a complaint under Section 138 N.I. Act against the Appellant on the note that she was holding the position of the Director of the Company. However, the complainant hadn't made any affirmation or allegations to prove how the appellant/Director is held responsible for managing the day-to-day affairs of the company. On perusing the complaint, the Supreme Court stated that merely because an Appellant is a director of a company, it is not necessary that she is aware of the day-to-day functioning of the company. Further, the court found that the averments made were not sufficient to invoke the provisions of Section 141 of the N.I. Act against the appellant as the complainant failed to show as to how and in what manner the Director was responsible for the conduct of the business of the Company when the cheque was dishonored.

# 'Don't Need Shoma Sen In Custody Anymore': NIA Tells Supreme Court in Bhima Koregaon Case



**Mumbai,** A significant development was seen in the Bhima Koregaon case, when the National Investigation Agency (NIA) made a surprising admission in the Supreme Court this week. The admission was made regarding former Nagpur University professor and Bhima Koregaon-accused Shoma Sen. The agency who is represented by Additional Solicitor General KM Nataraj, in their admission, admitted that they no longer require Sen's custody. This was, after a bench of Justices Aniruddha Bose and Augustine George Masih questioned him over the necessity of her continued detention. This week, the division bench finished hearing the oral arguments in a special leave petition filed by Sen challenging a January 2023 order of the Bombay High Court, by which it directed her to approach the special court trying her case, for bail. Sen has been lodged in jail since June 2018 for offences under the Unlawful Activities (Prevention) Act after being arrested in connection with the 2018 caste-based violence that broke out at Bhima Koregaon in Pune, and for having alleged links with CPI (Maoists). The top court issued notice in Sen's special leave petition in May last year, along with co-accused Jyoti Jagtap's bail plea.

# डेबिट, क्रेडिट कार्ड डाटा सुरक्षित करण्याच्या नावाखाली गंडा घालणारी टोळी गजाआड

## दक्षिण विभाग सायबर पोलिसांची कारवाई



■ **मुंबई** : डेबिट, क्रेडिट कार्डचा डाटा सुरक्षित करण्याच्या नावाखाली क्रेडिट कार्ड आणि बँक खात्याची गोपनीय माहिती ऑनलाइन शॉपिंग करून नागरिकांना लाखो रुपयांना गंडा घालणाऱ्या टोळीचा दक्षिण विभाग सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी सात जणांना पश्चिम बंगाल येथून बेड्या ठोकल्या असून, कोलकाता येथील कॉलसेंटर उद्ध्वस्त केले आहे. चर्चगेट परिसरातील रहिवासी असलेल्या यातील तक्रारदार यांच्यासह त्याच्या कुटुंबातील सदस्यांची बँक खाती, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड यांची माहिती मिळवून आरोपींनी तक्रारदार, त्यांची पत्नी आणि परदेशात राहणाऱ्या मुलीच्या बँक खात्यामधून पैसे क्रेडिट कार्डमध्ये वळवले. पुढे, क्रेडिट कार्डच्या माध्यमातून फ्लिपकार्ट, मिंत्रा, स्विगी यासारख्या वेगवेगळ्या ऑनलाइन साईटच्या माध्यमातून तब्बल १ कोटी ४८ लाख ५६ हजार रुपयांची शॉपिंग केली. २९ फेब्रुवारी ते ३ मार्चदरम्यान हा प्रकार घडला होता. सायबर फसवणुकीची शिकार बनलेल्या तक्रारदार यांनी दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानुसार, अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाण्याचे वपोनि. नंदकुमार गोपाळे यांच्या नेतृत्वातील पथकाने गुन्ह्याचा तपास सुरू केला. गुन्ह्यातील आरोपींनी क्रेडिटच्या माध्यमातून मागवलेल्या महागड्या वस्तू कोलकाता येथे विविध ठिकाणी डिलिव्हर झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. गुन्ह्यातील तांत्रिक पुराव्यांच्या मदतीने पोलीस पथक कोलकाता येथे पोहोचले. पोलीस आल्याचे समजताच आरोपींनी सिलीगुडी येथे पळ काढला. मात्र, मुंबई पोलिसांच्या पथकाने कोलकाता येथील स्थानिक पोलिसांच्या मदतीने सिलिगुडी येथून रयान शाहदास (२२), अरुणभा हल्डर (२२), रितम मंडल (२३), तमोजीत सरकार (२२), रजिब शेख (२४), सुजोय नासकर (२३) आणि रोहीत बैद्य (२३) यांना ताब्यात घेत अटक केली. आरोपींजवळून ५० लाखांच्या रोख रकमेसह २७ मोबाईल, पाच महागडी घड्याळे, तीन इअर बर्ड, एक मॅकबुक, एक आयपॅड, ११ महागड्या परफ्युमच्या बाटल्या, दोन लेडिज बॅग, दोन रेफ्रिजरेटर, दोन वातानुकूलित यंत्रणा, दोन प्रिंटर आणि एक किचन चिमणी जप्त करण्यात आली. तसेच दाखल गुन्ह्यात तक्रारदारांची फसवणूक करून आरोपींनी मागवलेल्या ६० लाख रुपये किमतीच्या वस्तूंची ऑनलाइन डिलिव्हरी थांबवण्यात पोलिसांना यश आले आहे.

भारतीय आणि विदेशी नागरिकांना गंडा घालण्यासाठी आरोपींनी कोलकाता येथे कॉल सेंटर थाटले होते. या कॉल सेंटरमधून नागरिकांना कॉल करून डेबिट, क्रेडिट कार्ड आणि बँक खात्याच्या सुरक्षित वापराबाबत माहिती देऊन त्यांच्याकडून माहिती घेत होते. याच माहितीच्या आधारे आरोपी ऑनलाइन शॉपिंग करून नागरिकांची फसवणूक करत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेचे सह आयुक्त लखमी गौतम, अप्पर पोलीस आयुक्त शशिकुमार मिना, पोलीस उपायुक्त (प्रकटीकरण) दत्ता नलावडे, सायबर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त अबुराव सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाण्याचे वपोनि. नंदकुमार गोपाळे, पोलीस निरीक्षक किरण जाधव, पोलीस निरीक्षक मर्गेश मजगर, पोलीस उप निरीक्षक सचिन त्रिमुखे, पोउनि. श्वेता कढणे, पोउनि. धनवेश पाटील, सपोनि. श्रीराम घोडके, पोना. संतोष गलांडे, पोना. संदिपान खरजे, प्रवीण चाळके, किरण झुंजार पोशि. निखिल गाडे यांनी ही कामगिरी बजावली आहे.

## मुंब्र्यात १४ लाखांची फसवणूक

■ **मुंब्रा** : शेअर मार्केटिंगच्या नावावर पीआरओझेडओएसकेए या ॲपमध्ये खाते उघडण्यास सांगून १४ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. ४ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान मयुर पाटील या पारसिकनगर येथील व्यक्तीला अनोळखी मोबाईलधारक महिला व तीन जणांनी व्हॉट्स ॲप व टेलिग्राम ग्रुपमध्ये सहभागी करुन घेतले. त्यानंतर शेअर मार्केटिंग करता पीआरओझेडओएसकेए या ॲपमध्ये डिमॅट खाते उघडण्यास सांगितले व १४ लाख ५० हजार रुपये फसवणूक केली.

## नफ्याच्या आमिषापोटी लाखोंचा गंडा

■ **ठाणे** : ठाण्याच्या नौपाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या महिलेला अनोळखी व्यक्तीने शेअर खरेदीत ३०० टक्के नफ्याचे आमिष दाखवून ऑनलाइन शेअर खरेदी करत २० लाख ५० हजाराचा आर्थिक गंडा घातल्याची तक्रार नौपाडा पोलिस ठाण्यात दाखल केलेली आहे.अनोळखी मोबाईलधारक व्यक्तीने व्हॉट्स ॲपवर मॅसेज करून, व्हॉट्स ॲप ग्रुपमंध्ये ॲड करून शेअर मार्केट मधून शेअर्स व आयपीओ खरेदी केल्यास ३०० टक्के परतावा मिळण्याचे अमिष दाखविले. त्यानंतर तक्रारदारचा विश्वास संपादन करत फाईन फॅब्रीक बँक व अरबन कलेक्शन बँक या खात्यात २० लाख ५० हजार रूपयांचा भरणा करून शेअर्स ऑनलाईन खरेदी करण्यास सांगून आर्थिक फसवणूक केली.

## ठाण्यात टेम्पोची बसस्टॉपला धडक

■ **ठाणे** : ठाण्याच्या हिंदुस्तान को-ऑपरेटिव बँक समोर, यशोधन नगर नाका येथे टेम्पोवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो बस स्टॉपवर धडकला. अखेर त्याला गॅस कटरने कट करून काढण्यात आला.या अपघातात कुणालाही दुखापत झालेली नाही. टेम्पो चालक गोपाळ गिरी हा टेम्पो चालवत असताना टेम्पोचे नियंत्रण सुटले आणि वाहन फुटपाथवर चढले आणि तेथे असलेला बस स्टॉपला टेम्पोने धडक दिली. या धडकेने बस स्टॉप निकामी झाला अखेर बसस्टॉप हा गॅस कटरने कापून बाजूला काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरु करण्यात आले.

## महेश गायकवाड यांच्यावर खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल



■ **कल्याण**: : कल्याण पूर्वेतील शिंदे गटाचे शिवसेनेचे शहरप्रमुख आणि माजी नगरसेवक महेश दशरथ गायकवाड यांच्यावर शुक्रवारी संध्याकाळी नवी मुंबईतील एका बांधकाम व्यावसायिकाने पाच कोटीची खंडणी मागितल्याचा आरोप करत उल्हासनगर मधील हिललाईन पोलीस ठाण्यात शुक्रवारी तक्रार केली. पोलिसांनी महेश गायकवाड यांच्यासह मलंगवाडी येथील चार ग्रामस्थांवर खंडणी, दमदाटीचे गुन्हे दाखल केले आहेत. जमीन विषयीच्या प्रकरणात महेश गायकवाड यांच्यावर हिललाईन पोलीस ठाण्यात दाखल झालेला हा गेल्या दोन महिन्यातील दुसरा गुन्हा आहे. या गुन्ह्यांमुळे महेश यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. आरोपींमध्ये महेश गायकवाड, यशवंत मुका फुलोरे, रोहिदास मुका फुलोरे, गणेश यशवंत फुलोरे, शेवंतीबाई मुका फुलोरे यांचा समावेश आहे. गेल्या महिन्यात भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी गोळीबार केल्यानंतर महेश हे २५ दिवस ज्युपिटर रुग्णालयात उपचार घेत होते. आताच ते सुस्थितीत होऊन विकास कामे मार्गी लावण्यासाठी सक्रिय झाले आहेत. नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील पारसिक हिल भागात राहणारे बांधकाम व्यावसायिक सद्दध्दीन बशर खान (५८) यांनी हा गुन्हा दाखल केला आहे. त्यांची एफएस ग्रुप ऑफ कंपनीज ही बांधकाम कंपनी आहे. ऑगस्ट २०२३ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत हा खंडणी मागण्याचा प्रकार घडला आहे. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार सद्दध्दीन खान यांनी २००९ मध्ये इक्बाल खान यांच्या ओळखीने मलंगगडाच्या पायथ्याशी असलेल्या कुशीवली गावातील श्यामसुंदर लक्ष्मण पाटील यांची २७एकर जमीन महसूल विभागाच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करून, खरेदी विक्रीची दस्त नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून जमीन खरेदी केली.

## बेलापूर न्यायालयाने मध्यरात्रीपर्यंत घेतली सुनावणी

■ **नवी मुंबई** : बेलापूर न्यायालयातील न्या. आवटे पी. पी. यांनी एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी मध्यरात्री पावणे एक वाजेपर्यंत न्यायालयाचे कामकाज सुरू ठेवून इतर न्यायालयासमोर आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळे या न्यायाधीशांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तुर्भे येथील सामंत विद्यालयासमोर बुधवारी दुपारी पाच ते सहा अल्पवयीन मुलांच्या गटाने आदित्य बाबासाहेब भोसले (१७) व देवांग संदिप ठाकूर (१७) या दोन तरुणांना मारहाण केली होती. यात आदित्य भोसले याचा मृत्यू, तर देवांग हा गंभीर जखमी झाला होता. या घटनेनंतर एपीएमसी पोलिसांनी त्याच दिवशी सहा अल्पवयीन मुलांना हत्येच्या गुन्ह्यात ताब्यात घेतले होते. ताब्यात घेतलेले सर्व मुले ही अल्पवयीन असल्याने पोलिसांनी त्यांना गुरुवारी दुपारी भिवंडी येथील बाल न्यायालयात हजर करण्यासाठी नेले होते. मात्र, ताब्यात घेण्यात आलेल्या सहा मुलांपैकी विशाल गुलाब बारिया या मुलाचे वय २० वर्षे असल्याचे त्याच्या जन्मतारखेवरून निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी पाच अल्पवयीन मुलांना भिवंडी येथील बाल न्यायालयात हजर केले.

मात्र, विशाल बारिया अल्पवयीन नसल्याने त्याला २४ तासांच्या आत न्यायालयात हजर करणे बंधनकारक होते. त्यामुळे एपीएमसी पोलिसांनी आरोपी विशाल याला भिवंडी येथून रात्री ८ वाजता बेलापूर न्यायालयात हजर करण्यासाठी आणले. त्यानंतर पोलिसांनी बेलापूर न्यायालयातील न्या. आवटे पी. पी. यांना याबाबतची माहिती दिल्यानंतर त्यांनी या हत्या प्रकरणातील आरोपीच्या पोलीस कोठडीवर सुनावणी घेण्यासाठी मध्यरात्री पावणे एक वाजेपर्यंत कामकाज सुरू ठेवले. या वेळी सरकारी वकील रितेश सोनटक्के यांनी पोलिसांतर्फे जोरदार बाजू मांडली. त्यामुळे न्या. आवटे पी. पी. यांनी या हत्या प्रकरणातील आरोपी विशाल बारिया याला १९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी ठोठावली.

# एकत्रित परिवहन सेवेला मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदील

## कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूरमध्ये धावणार ईव्ही बसेस

■ **कल्याण** :मुंबई महानगर क्षेत्रातील कल्याण - डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर महानगरपालिका तसेच अंबरनाथ व कुळगांव - बदलापूर नगरपरिषद या क्षेत्रांची एकत्रित परिवहन सेवा स्थापन करण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिरवा कंदिल दिला आहे. यामुळे नजिकच्या काळात या शहरांध्येही ईव्ही बसेस धावणार असून त्यामुळे या भागात हवेतील प्रदूषणही कमी होणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील कल्याण - डोंबिवली महापालिका क्षेत्रा नजिकच्या भिवंडी - निजामपूर शहर महापालिका, उल्हासनगर महापालिका, अंबरनाथ व कुळगांव बदलापूर नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिवहन सेवा पुर्ण क्षमतेने अस्तित्वात नाहीत. या क्षेत्रांमध्ये कल्याण - डोंबिवली महापालिकेच्या परिवहन उपक्रमाची बससेवा सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. त्यानुसार पालिकेने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकसंकल्पात एकत्रित परिवहन सेवेचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवल्याचे सांगितले होते. या एकत्रित परिवहन सेवेचे क्षेत्र २२५ चौरस किलोमीटर इतके मोठे असून गेल्या १३ वर्षात या भागातील लोकसंख्येतही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. त्या तुलनेत पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यावर शासन भर देत आहे. त्याचाच एक भाग म्हणून एकत्रित परिवहन सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

भविष्यात एकत्रित परिवहन सेवेमुळे प्रवाशांना सुलभ व सहज वाहतूक सेवा रास्तदरात उपलब्ध होणार आहे. तसेच परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणार असून यामुळे वाहतूक कोंडीची समस्या कमी होण्यास मदत होणार आहे. प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण संरक्षणावर शासनाचा भर आहे. या परिवहन सेवेत नवीन ईव्ही बसेस अंतर्भुत करण्यात येणार असल्याने शहरामधील हवा प्रदूषणाची पातळी नियंत्रित आणि कमी करणे शक्य होणार आहे.

### शहाड येथे परिवहन भवन

◆या परिवहन सेवेकरता कल्याण – डोंबिवली महापालिका क्षेत्रामध्ये शहाड येथे एकत्रित परिवहन उपक्रमाच्या प्रशासकीय कार्यालयासाठी परिवहन भवन बांधण्यात येणार आहे. एवढ्या विस्तृत परिसरासाठी एकत्रित परिवहन सेवेमुळे या भागातील विकासाला मोठी चालना मिळण्यास मदत होणार आहे. परिवहन सेवेतून नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सेवा मिळू शकेल असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला आहे.





## पाण्याची चोरी करणाऱ्यावर गुन्हा

■ **भिवंडी**: भिवंडी शहर महानगरपालिकेच्या रस्त्यावर अवैधपणे खोदकाम करून जलवाहिनीला अनधिकृतरित्या टुपिंग करून महापालिकेचे नुकसान केल्याप्रकरणी मनपा प्रभाग समितीच्या बिट निरीक्षकाच्या फिर्यादीवरून एका तरुणाच्या विरोधात निजामपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शब्बीर खतीब असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे.वाणी आळीत १२ मार्च रोजी स्मार्टस किडस प्ले ग्रुपच्या बाजूला शब्बीरने महापालिका प्रशासनाची कोणत्याही प्रकारची पूर्व परवानगी न घेताच महापालिकेच्या रस्त्याला अनधिकृतपणे खोदकाम केले.त्यानंतर महापालिका जलवाहिनीला टुपिंग करून एका तळ अधिक तीन मजला इमारतीच्या पाण्याच्या टाकीत अर्धा इंच व्यासाचे दोन नळ कनेक्शन जोडून पाणी संकलित करून तो पाणी हॉटेल पुरवून महापालिकेचे एकूण ७० हजार रुपयांचे नुकसान केले आहे.

# ठाण्यातील 'या' भागात उष्णतेचा प्रभाव सर्वाधिक, महानगरपालिका करणार उपाययोजना

■ **ठाणे** : ठाणे शहरातील उष्णते संदर्भात ठाणे महापालिकेने उष्णता नियंत्रण कृती आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार वागळे इस्टेट भागात उष्णतेचा प्रभाव सर्वाधिक जाणविण्याची शक्यता महापालिकेने व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर उष्णतेच्या धोक्याबाबत नागरिकांसाठी उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिका सर्वेक्षण करणार आहे.हरीत वायूच्या वाढत्या उत्सर्जनामुळे शहरातील तापमानामध्ये वाढ होत आहे. समुद्र, खाडी किनाऱ्याच्या शहरांमध्ये आद्रतेचे प्रमाण जास्त असते. जेव्हा तापमान ३० डिग्रीपेक्षा जास्त असते व हवेच्या आद्रेचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त असते. तेव्हा शरीराला जाणवणाऱ्या तापमानामध्ये ३ ते ४ अंशांची वाढ जाणवते. त्यामुळे उन्हाचा त्रास जास्त जाणवतो. सर्वसामान्य नागरीक, शालेय विद्यार्थी, कामगार यांच्यावर होणारा अती तीव्र उष्णतेचा परिणाम नियंत्रित करण्याच्या दृष्टीने ठाणे महापालिकेने उष्णता नियंत्रण उपाययोजना कृती आराखडा तयार केला आहे.या कृती आराखडासाठी १९८२ ते २०२४ या कालखंडातील वातावरणाची माहिती तसेच प्रत्यक्षातील सामाजिक-आर्थिक स्तर, उपग्रहावरून प्राप्त झालेली माहिती आधारभूत धरण्यात आली आहे. शरीराला जाणवणाऱ्या उष्णतेच्या परिमाणाची मानके तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे उष्मा जास्त झाल्यावर, शरीराला जाणवणाऱ्या उष्णतेच्या लाटेबद्दलची धोक्याची सूचना आगाऊ देता येत आहे. महापालिकेने प्रभाग समितीनिहाय माहिती संकलित केली आहे. त्या संकलित केलेल्या शास्त्रोक्त माहितीनुसार वागळे प्रभाग समिती क्षेत्रात उष्णतेचा जास्त प्रभाव जाणवणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.तात्काळ जाणवणाऱ्या उष्णतेच्या धोक्याबाबत नागरिकांसाठी उपाययोजना करण्यात येणार आहे. त्यासाठी ठाणे महापालिका, कौन्सिल ऑन एनर्जी एन्व्हायरोमेंट अँड वॉटर या संस्थेने तयार केलेल्या प्रश्नावलीनुसार सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

## डोंबिवली एमआयडीसी मधील दुर्घटनेत दोन कामगारांचा मृत्यू

■ **डोंबिवली** : डोंबिवली एमआयडीसीतील दोन कंपन्यांमध्ये घडलेल्या दुर्घटनांमध्ये दोन कामगारांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या घटनांमुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एमआयडीसी परिसरात असलेल्या कंपन्या आपल्या कामगारांच्या सुरक्षिततेबाबत कोणत्याच उपाययोजना करत नाहीत. कामगारांच्या सुरक्षिततेबाबत हलगर्जीपणा करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करावी, अशी मागणी आता पुढे येत आहे. डोंबिवली एमआयडीसी फेज वनमध्ये असलेल्या कलिक्स केमिकल्स फार्मासिटिकल लिमिटेड या कंपनीत केमिकलचा ब्लास्ट झाला. या दुर्घटनेत एका कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या कंपनीत औषध बनवण्याचे काम केले जाते. गुरुवारी दुपारी एक वाजता सुमारास ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभाग घटनास्थळी दाखल झाल्यावर आग आटोक्यात आणली गेली. मात्र, या दुर्घटनेत संतोष खांबे या कामगाराचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या घटनेत कल्याण-शिळ रोडवरील एमआयडीसीमधील नवरंग नाक्यावर असलेल्या श्रीजी लाईफस्टाईल कंपनीत अचानक झालेल्या हिटचा त्रास होऊन एका कामगाराला अचानक उलट्या झाल्या. या कामगाराला त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान या कामगाराचा मृत्यू झाला. पवन सिंग असे या कामगाराचे नाव आहे. या दोन घटनांनंतर एमआयडीसी परिसरात काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पवन सिंग यांच्या नातेवाईकांनी जोपर्यंत नुकसानभरपाई मिळत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा इशारा दिला.

# घरफोड्या करणारा सराईत चोरटा पोलिसांच्या जाळ्यात

## १२ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत



■ **नवी मुंबई** : रबाळे पोलिसांनी रात्रीच्या सुमारास घरफोडी करणाऱ्या अंकुश उत्तम ढगे (३९) या सराईत चोरट्याला ३६ तासांत अटक करून त्याने रबाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीत केलेले १२ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या गुन्ह्यातील तब्बल १२ लाख ३५ हजार रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने हस्तगत करण्यास पोलिसांना यश आले आहे.

घणसोलीतील संजय हाईट्स इमारतीत राहणारे रघुनाथ शेलार (४३) हे गेल्या ९ मार्च रोजी खांदा कॉलनी येथील त्यांच्या नातेवाईकास भेटण्यासाठी गेले असताना अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास बंद असलेल्या त्यांच्या घराचा कडीकोयंडा तोडून, कपाटातील लॉकर उचकटून त्यातील २ लाख ३७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. याबाबत रबाळे पोलीस ठाण्यात दुसऱ्या दिवशी गुन्हा दाखल झाल्यानंतर रबाळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी दीपक खरात व त्यांच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे या घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीचा शोध सुरू केला.

यावेळी या घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपी अंकुश ढगे हा घणसोली गावातील जिजामाता नगरमधील महालक्ष्मी अपार्टमेंटमध्ये राहत असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी ढगे याच्या घरावर छापा टाकून त्याला घरफोडी करण्यासाठी वापरण्यात येणारे स्क्रू-ड्रायव्हर व एक लोखंडी क्रुपाना आदी वस्तूंसह शिताफीने ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता त्याने घणसोली परिसरात अनेक ठिकाणी रात्रीच्या सुमारास घरफोड्या करून सोने चांदीचे दागिने चोरल्याचे व त्यातून मिळालेली रक्कम त्याच्या उदरनिर्वाहासाठी व मौजमजेसाठी खर्च केल्याची कबुली दिली. अधिक तपासात त्याने रबाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२ घरफोड्या केल्याचे उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली.

> रबाळे पोलिसांनी अटक केलेला सराईत चोरटा अंकुश उत्तम ढगे याने रबाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकूण १२ घरफोडीचे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. या गुन्ह्यातील १२ लाख ३५ हजार रुपये किमतीचे २० तोळे सोन्याचे दागिने व ५०० ग्रॅम चांदीचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. या आरोपीविरोधात यापूर्वी कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११, रबाळे एमआयडीसी, आझाद नगर पोलीस ठाणे, कोन गाव पोलीस ठाणे तसेच एन. एम .जोशी मार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रत्येकी–१ असे एकूण १५ गुन्हे दाखल आहेत.
>
> – पंकज डहाणे पोलीस उपआयुक्त परिमंडळ–१

## पनवेल तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक एसीबीच्या जाळ्यात

■ **नवी मुंबई** : पनवेल तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक किरण अर्जुन गोरे (४८) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) नवी मुंबई युनिटने गुरुवारी सायंकाळी ४० हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले. गोरे यांनी वडिलोपार्जित शेतजमिनीची नोंद कमी करून भोगवटादार वर्ग-२ वरून त्या जमिनीची भोगवटादार वर्ग-१ असे दोन स्वतंत्र सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीची नोंद करून देण्यासाठी लाचेची मागणी केली होती. गोरे यांनी यापैकी एका जमिनीची नोंद करण्याकरता ४० हजारांची लाच स्वीकारल्यानंतर त्यांना सापळा लावून अटक करण्यात आली.

पनवेल तालुक्यातील गिरवले येथे राहणारे जयदास गायकर यांनी त्यांच्या वडिलोपार्जित शेतजमिनीचे मुंबई कूळव्यवस्थापन व शेतजमिनी कायद्यांतर्गत जमिनीची नोंद कमी करून भोगवटादार वर्ग-२ वरून सदर जमिनीची भोगवटादार वर्ग-१ अशी दोन स्वतंत्र सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीची नोंद करण्यासाठी पनवेल तहसील कार्यालयात गत जानेवारी महिन्यात अर्ज सादर केला होता. मात्र, या कामासाठी पनवेल तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक किरण गोरे यांनी गायकर यांच्याकडे १ लाख रुपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे गायकर यांनी एसीबीच्या नवी मुंबई येथील कार्यालयात तक्रार दिली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीने लाचेच्या मागणीची सत्यता पडताळणी केली असता, किरण गोरे यांनी गायकर यांच्याकडे तडजोडीअंती ८९ हजार रुपये लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गोरे यांनी एका जमिनीच्या नोंदीकरता ४० हजार रुपये लाचेची मागणी केली असता, एसीबीने गुरुवारी सायंकाळी पनवेल तहसील कार्यालयात सापळा लावला होता. या वेळी किरण गोरे यांनी गायकर यांच्याकडून ४० हजारांची लाच स्वीकारल्यानंतर त्यांना एसीबीने रंगेहाथ पकडले. त्यानंतर रात्री उशिरा गोरे यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस उप अधीक्षक शिवराज म्हेत्रे व त्यांच्या पथकाने केली.

## द्विवेदीविरुद्ध जामीनपात्र वॉरंट जारी

### मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण

■ **मुंबई** : २००८ मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी गैरहजर राहिल्यामुळे आरोपी साध्वी प्रज्ञासिंग ठाकूर यांच्या पाठोपाठ आणखी एक आरोपी सुधाकर द्विवेदीविरुद्ध विशेष एनआयए न्यायालयाने जामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. सुनावणीला वारंवार गैरहजेरी लावल्याने द्विवेदीविरुद्ध १० हजार रुपयांचे वॉरंट विशेष न्यायालयाचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी बजावले. तसेच २० मार्चच्या पुढील सुनावणीला हजर राहण्याचे आदेशही दिले.

मालेगावमधील एका मशिदीत झालेल्या बॉम्बस्फोटात सातजणांना आपले प्राण गमवावे लागले होते. या प्रकरणी लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, रमेश उपाध्याय, समीर कुलकर्णी, सुधाकर चतुर्वेदी, सुधाकर द्विवेदी, अजय राहिरकर यांना अटक करण्यात आली होती. मुंबईतील विशेष एनआयएचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांच्यासमोर हा खटला नियमित सुरू आहे.

## टीसीएस कर्मचाऱ्याला सायबर गंडा

■ **मुंबई** : स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाने इन्स्टिट्यूशनल खात्यात गुंतवणूक केल्यास दुप्पट रक्कम देण्याचे आमिष दाखवून सायबर ठगांनी टीसीएसच्या कर्मचाऱ्याला १ लाख ६१ हजार रुपयांना ऑनलाइन गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून नवघर पोलीस अधिक तपास करत आहेत. मुलुंड पूर्वेकडील अरुणोदय नगर परिसरात राहात असलेले ४७ वर्षीय सचिन हे टीसीएस कंपनीमध्ये नोकरी करतात. गेल्या वर्षी २३ नोव्हेंबरला त्यांना आशा नावाच्या महिलेच्या मोबाईल नंबरवरून स्टॉक मार्केट ग्रुपमध्ये जॉइन होण्यास इच्छुक आहात का, अशी विचारणा करणारा मेसेज व्हॉट्सॲपवर आला. उत्सुकतेपोटी सचिन यांनी त्या नंबरवर होय असे उत्तर दिले.सचिन यांना लगेचच एका ग्रुपमध्ये ॲड करण्यात आले.

## स्लॅब पडल्याने इमारत केली रिकामी



■ **ठाणे** : नौपाडा भागातील एका तळ अधिक ९मजली इमारतीच्या सातव्या मजल्यावरील बाहेरील बाजूला असलेल्या प्लास्टरचा काही भाग पडल्याची घटना गुरुवारी सांयकाळी घडली.सुदैवाने यात कोणत्याही प्रकारची जिवीतहानी झालेली नाही.परंतु सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून ही इमारत तात्पुरत्या स्वरुपात रिकामी करण्यात आली असल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. नौपाडा, नाईकवाडी परिसरात गोखले रोड जवळ ही तळ अधिक ९ मजल्याची इमारती असून ती २७ वर्षे जुनी आहे. गुरुवारी सांयकाळी सव्वा सात वाजताच्या सुमारास या इमारतीच्या सातव्या मजल्यावरील प्लास्टर पडले.